संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# श्रीमंत पालिकेतला श्रीमंती गैरव्यवहार

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि या आर्थिक राजधानीचा कारभार पाहाणारी मुंबई महापालिका ही आर्थिकदृष्ट्या संपन्न आहे. तब्बल तीस हजार कोटींचे अंदाजपत्रक असणारी भारतातली एकमेव महानगरपालिका असू शकते. किंबहुना ज्या महानगरपालिकेकडे स्वतःच्या स्वतंत्र पन्नास हजार कोटींच्या ठेवी असाव्यात हा कदाचित जागतिक विक्रमही असू शकतो. एखादी स्वायत्त संस्था तिला मिळणाऱ्या उत्पन्नातून इतकी मोठी रक्कम राखीव स्वरुपात संकलित करू शकते. हे निश्चितच वैशिष्ट्यपूर्ण आहे. परंतु शेवटी जिथे श्रीमंती येते तिथे उधळमाधळही दिसून येते. आणि मग या सर्वात मोठ्या महानगरपालिकेच्या किंवा स्वतः ला श्रीमंत म्हणवून घेणाऱ्या मुंबई महानगरपालिकेत तितक्याच अक्कलहुशारीचे आणि श्रीमंती थाटाचे गैरप्रकारही होत राहातात. साधारणपणे दरवर्षी संपूर्ण शहर आणि उपनगरात दहा ते पंधरा हजार कोटींची छोटी मोठी कामे केली जातात. या कामांमध्ये भ्रष्टाचार होऊ नये किंवा कंत्राटदारांची कामे करताना लाचखोरीचे प्रकार घडू नयेत. म्हणून महानगरपालिकेने ऑनलाईन म्हणजेच ई-टेंडरिंग प्रणाली सुरु केली. लोकांचा असा समज होऊ शकतो की, या प्रकारामुळे निविदा भरण्याची किंवा उघडण्याची फारच शास्त्रशुध्द पध्दत अवलंबली गेली आहे आणि कोणत्याही भ्रष्टाचाराला किंवा गैरकारभाराला वाव राहिलेला नाही. परंतु हा समज पूर्णपणे खोटा ठरवणारा प्रकार याच श्रीमंत महापालिकेत घडला आणि शहर उपनगरातल्या विविध विभाग कार्यालयांमध्ये ई-टेंडरिंग असूनही तब्बल शंभर कोटींचा गैरकारभार झाल्याचे उघड झाले आहे आणि यामध्ये बावीसपेक्षा जास्त अभियंते एक साहाय्यक आयुक्त आणि इतर कर्मचारी मिळून ६३ जणांचा समावेश असल्याचेही समोर आले आहे. यासंदर्भातली माहिती मिळाल्यानंतर अंतर्गत चौकशी समिती नेमली गेली आणि त्यातून त्यात हात असलेल्या या ६३ जणांची जंत्री बाहेर आली. अर्थातच हा या श्रीमंत महानगरपालिकेतल्या ई -टेंडरिंगच्या भ्रष्टाचार सागरातला एक हिमनग असावा. कारण यापेक्षाही मोठमोठ्या रकमांची कामे दिली जात असतात. यामध्ये वापरलेली गैरव्यवहाराची कार्यप्रणाली अन्य कामातही असू शकते. त्यातून याच्या किमान पाचपट रकमेचा गैरकारभार झालेला असू शकतो. म्हणजे कोणत्याही प्रकारची आधुनिक तंत्रप्रणाली आणली तरी भ्रष्टाचार किंवा गैरकारभार थांबण्याची सूतराम शक्यता दिसत नाही.

## अभियंत्यांचीच संख्या जास्त

या गैरव्यवहारात अडकलेल्यांमध्ये तुलनेने अभियंत्यांचे प्रमाण जास्त आहे. यापूर्वीसुध्दा रस्ते घोटाळ्यात अभियंत्यांवरच कारवाई करण्याची वेळ आली होती तो आकडादेखील असाच पंधरा ते वीसच्या आसपास होता. म्हणजेच विविध प्रकारच्या कामांच्या मंजुरीकरीता अभियंत्यांना असलेले अधिकार आणि त्यांचे कंत्राटदारांशी असलेले साटेलोटे अधिक चिंतीजनक ठरते. मुंबई महापालिकेतला हा काही नवीन प्रकार नाही. अगदी जमशेद कांगा हे महापालिका आयुक्त असताना काही बड्या बिल्डर्सना ज्यादा चटईनिर्देशांक देऊन त्यांचे इमारत आराखडे मंजूर करण्याचा प्रकार घडला होता. त्यावेळीही इमारत बांधकाम खात्यातील पाच वरिष्ठ अभियंत्यांवर कारवाई केली गेली. ही साधारण १९८७-८८ मधील घटना असेल. परंतु स्थायी समितीला यासंदर्भात त्याकाळी अधिकार होते आणि मग जवळजवळ सात आठ महिन्यानंतर या अभियंत्यांवरची कारवाई मागे घेतली गेली. गैरकारभाराची ही परंपरा तशीच पुढे चालू आहे. फक्त कारवाईचे अधिकार आयुक्तांकडे असल्याने आता स्थायी समिती किंवा नगरसेवक त्यात फारशी लुडबुड करू शकत नाहीत. प्रश्न फक्त एवढाच आहे की, आता या ६३ दोषी कर्मचाऱ्यांवर त्यांची वार्षिक वेतनवाढ रोखण्याची आणि काही जणांची पाच वर्षांसाठी वेतनवाढ थांबवण्याची कारवाई केली जाणार आहे. गैरकारभाराचे स्वरुप लक्षात घेता ही कारवाई पुरेशी आहे का याचा तर विचार झाला पाहिजेच. परंतु ज्या कंत्राटदारांनी यामध्ये मोठी भूमिका पार पाडली त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे. कारण जोपर्यंत कंत्राटदार आणि हे अधिकारी यांच्यातले संबंध नष्ट होत नाहीत. किंवा त्यावर नजर ठेवली जात नाही तोपर्यंत हे गैरकारभार थांबू शकत नाहीत. एक मात्र खरे की आतापर्यंतच्या गैरव्यवहारांमध्ये एकाचवेळी इतक्या मोठ्या संख्येने पहिल्यांदाच पालिका कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

## पारदर्शकतेचे तीन तेरा

हा सगळा ई-टेंडरिंगचा प्रकार महापालिकेच्या श्रीमंती थाटाला शोभेसाच म्हणावा लागतो. कारण भरपूर पैसा असल्याने तो ओरबाडण्याकरीता तितकीच वेगवेगळी शक्कल लढवली जाते. एक बरे झाले की मुंबई महापालिकेसारख्या त्यातल्या त्यात कार्यक्षम महापालिकेत ई - टेंडरिंग प्रणालीतला सदोषपणा सिध्द झाला. याचा अर्थ राज्यसरकारच्या प्रत्येक खात्यामध्ये अशाच प्रकारची युक्ती वापरून पूर्वीप्रमाणेच भ्रष्टाचार सुरु आहे. असे छातीठोकपणे म्हणता येऊ शकते. म्हणजे व स्तुस्थितीला धरून नाही असे म्हणता येऊ शकते. राज्यात जवळपास दहा ते पंधरा नगरपालिका आहेत. त्या सगळ्या ठिकाणी कोट्यवधीची कामे होत असतात. अशावेळी स्थानिक कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमतातून काय काय प्रकार घडत असतील याचा सहजपणे अंदाज करता येतो. थोडक्यात सांगायचे तर भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होण्याची लक्षणे नाहीत. हे या आधुनिक ई-टेंडरिंग प्रकाराने सिध्द केले आहे. हिंदीमध्ये अकल बडी की भैस बडी अशी एक म्हण आहे. महापालिकेने भैस भी बडी आणि अकल भी बडी, असे सांगून या गैरकारभाराचा नवा फंडा सादर केला आहे. नवे तंत्रज्ञान, नवा भ्रष्टाचार किंवा तंत्रज्ञानालाही मागे टाकणारा भ्रष्टाचार असे या सगळ्या प्रकारचे वर्णन करावे लागेल. तीस हजारकोटींचे अंदाजपत्रक असलेल्या या महापालिकेत किती हजार कोटी अशा पध्दतीने जात असतील याचाही केवळ अंदाजच करावा लागतो.